# वेध - एक प्रवास

गेली १६ वर्षे आमची पालकमंच संवेदना, ही संस्था कोल्हापूरमध्ये पालकत्वाचे निरनिराळे प्रकल्प राबवते आहे. काही सामाजिक प्रयोगही केले जातात. त्यासाठी महाराष्ट्रातील नामवंत सामाजिक व्यक्तींना बोलावून त्यांच्यातर्फे कोल्हापुरवासियाना मार्गदर्शन केले जाते. डॉक्टर अनिल अवचट, शुभदा जोशी, पु. गो. वैद्य, अपर्णा रामतीर्थकर, शोभा भागवत, अनिल भागवत, रवींद्र देशपांडे, कमलताई हर्डीकर ही काही उदाहरणे !

त्याच प्रमाणे काही अनोखे उपक्रमही राबवले जातात. मुलांची चित्रे वाचूया, विज्ञान सहल, पालक शाळा, सुजाण बाबा निबंध स्पर्धा, अभिनव वाचन स्पर्धा हे काही उपक्रम !

पुण्यातील पालकनीती परिवार च्या खेळघर प्रकल्प च्या प्रेरणेतून आणि शुभदा जोशी हिच्या मार्गदर्शनातून संस्थेने कोल्हापूर मध्ये ७ खेळघरे सुरु केली. ह्यासाठी आम्ही काही समविचारी मैत्रिणी एकत्र येऊन काही कार्यक्रम ठरवत असतो. ह्यातूनच एकदा आम्हाला सविता दामले ह्या मैत्रिणीकडून डॉ. आनंद नाडकर्णी सरांबद्दल समजले आणि आम्ही संस्थेतर्फे 'अरे संताप संताप' आणि 'ह्या मुलांशी वागायचं कसं?' ह्या शिक्षक आणि पालकांसाठी कार्यशाळा आयोजित केल्या. कोल्हापूरकरांच्या उदंड प्रतिसादामुळे आम्ही सर्वांनी वेध कोल्हापुरात व्हायलाच हवे ह्याचा ध्यासच घेतला आणि ह्या वर्षीची १३ नोव्हेंबर हि तारीख सर्वानुमते ठरलीसुद्धा ! आणि सर्वांमध्ये एक अगम्य उत्साह संचारला !

'अरे संताप संताप' कार्यक्रमाच्या वेळीच आम्हा सर्व पालकमंच सभासदांशी आनंददादांची छान ओळख झाली होतीच. त्यामुळे काहीही झाले तरी वेध कोल्हापुरात करायचेच ह्या विचारांनी त्याच वेळेपासून सर्वजण उत्साहाने कामाला लागले. मध्ये काही निमित्ताने वेध पुढे ढकलले गेले. पालकमंच च्या आम्ही बहुतांशी सभासद नोकरी व्यवसाय सांभाळत हि कामे करत असल्याने काही अडचणी येत गेल्या. पण २०१६ मध्ये काहीही झाले तरी वेध कोल्हापुरात करायचे ठरवले आणि आम्हा सर्व जणींना वेध चे 'वेध' आणि 'वेड' लागले.

आमची संस्था पालकत्वाशी निगडित असल्यामुळे, वेध साठी आनंददादांशी चर्चा करून 'जडण - घडण ' हा विषय ठरवला. आणि मग त्यासाठी योग्य व्यक्तींची निवड करण्यात आली . वेध च्या ठाणे येथील कार्यशाळेमुळे एरव्ही न जमणाऱ्या मीटिंग, चर्चा, एकत्र बसून निर्णय घेणे अशा गोष्टी खूपच सहज सोप्या आणि आनंददायी वाटू लागल्या. कारण कार्यशाळेत दोन दिवस व्यक्ती कशा ठरवायच्या, त्यासाठी थिम कशी ठरवायची इथपासून ते वेध संपेपर्यंत च्या सगळ्या गोष्टींचे छोटे छोटे बारकावे इतक्या सुंदर रीतीने शिकवले आहेत कि हि सर्व प्रक्रिया यंत्रवत न वाटता खूपच मनोरंजक वाटू लागली आहे.

वेध विद्यार्थी, शिक्षक व पालक ह्या सर्वांपर्यंत पोहोचण्यासाठी 'अभिनव वाचन स्पर्धा ' ह्यावर्षी वेध पूर्वी म्हणजे २५ सप्टेंबर ला घेण्याचे ठरले.

त्यात वेध शी निगडित असलेले हिरो आणि अर्थातच तुमचे आमचे सुपर हिरो आनंद दादा ह्यांची पुस्तके निवडण्यात आली. वेध कार्यशाळेतील मार्गदर्शनानुसार सभासदांचे वेगवेगळे गट करून प्रत्येकाकडे ठराविक जबाबदारी सोपवल्यामुळे एकाच वेळी खूप कामे होताहेत, हे खूप छान वाटतेय ! faculty शी बोलताना वेध साठी आम्ही तुम्हाला आमंत्रित करतोय हे त्यांना सांगताना आपण आता वेध चे झालो आहोत ह्या कल्पनेने अभिमानाने ऊर भरून येतोय.

वेध च्या तयारीच्या संदर्भात आम्हाला मदत करणारे पळशीकर सर, कुलकर्णी सर, IPH च्या ममता ताई आणि इतरही सर्वजण ह्यांना आम्ही अगदी कोणतीही शंका अगदी निःसंकोच विचारू शकतो एवढे हे सर्व जण फक्त गेल्या एक वर्षाच्या काळात आमच्याशी प्रेमाने बांधले गेले आहेत . एकूणच हा प्रवास खूप छान वाटतोय.

आता उत्सुकता आहे प्रत्यक्ष वेध ची !

पालकमंच संवेदना , कोल्हापूर